जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दूरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शा.नि.क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/ का-1444, दि. 16 फेब्रुवारी, 2008

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचा शा.नि.क्र.बीडीजी-2016/प्र.क्र.172/इमा-1, दि.19.09.2016

3. का.अ.सा.बां.वि.,परभणी यांचेकडील उपयोगिता व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र क्र.लेखा/अर्थ/4136/ , दि.06.07.2018

4. का.अ., सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेकडील अंदाजपत्रक क्र.लेखा/अर्थ/1347, दि.25.02.2019

5. का.अ., सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेकडील अंदाजपत्रक क्र.लेखा/अर्थ/1457, दि.28.02.2019

6. का.अ., सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेकडील अंदाजपत्रक क्र.1554/सप, दि.06.03.2019

---

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/प्र.मा./नि.वि./का.क्र.1/ 733 दि. 8 मार्च, 2019

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत शासकीय कार्यालयीन इमारतीसाठी रु 200.00 लक्ष तरतूद मंजूर आहे त्यापैकी यापूर्वी रु.139.41 लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

का.अ., सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी संदर्भ क्रं.6 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या कामासाठी **रु.68.68 लक्ष (अक्षरी रुपये अडुसष्ट लक्ष अडुसष्ट हजार फक्त)** च्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करुन **रु.35.00 लक्ष (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त)** चे निधी वितरण करण्यात येत आहे.

**परिशिष्ट - अ**

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव | मंजूर तरतूद | प्रशासकिय मान्यता रक्कम | यापूर्वी वितरित निधी | या आदेशान्वये वितरित निधी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी** | | | | | |
| | **शासकिय कार्यालयीन इमारती अंतर्गत -** | **200.00** | | | | |
| 1 | प्रशासकीय इमारत परिसरातील इमारती मध्ये प्रतिक्षागृह व पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे | | 68.68 | 0.00 | 35.00 | 35.00 |
| | **एकूण** | **200.00** | **68.68** | **0.00** | **35.00** | **35.00** |

**(अक्षरी रुपये सदुसष्ट लक्ष सदुसष्ट हजार फक्त)**

तसेच संदर्भ क्रं.4 व 5 अन्वये यापूर्वी मंजूर कामांसाठी खालीलप्रमाणे निधीची मागणी केलेली आहे त्यानूसार **रु.31.38 लक्ष (अक्षरी रुपये एकतीस लक्ष अडतीस हजार फक्त)** चे निधी वितरण करण्यात येत आहे.

**परिशिष्ट - ब**

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव | मंजूर तरतूद | प्रशासकिय मान्यता रक्कम | यापूर्वी वितरित निधी | या आदेशान्वये वितरित निधी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी** | | | | | |
| | **शासकिय कार्यालयीन इमारती अंतर्गत -** | **200.00** | | | | |
| 1 | परभणी येथील जिल्हा कोषागार कार्यालयाचे नुतनीकरण व स्वच्छतागृह बांधकाम करणे | | 22.00 | 12.62 | **9.38** | 22.00 |
| 2 | पुर्णा येथे सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभागीय अभियंता कार्यालय नविन इमारतीचे बांधकाम करणे | | 79.59 | 0.00 | **10.00** | 10.00 |
| 3 | पोलीस स्टेशन, पिंपळदरी अंतर्गत राणीसावरगाव दुरक्षेत्र येथे महिला पोलीस कर्मचारी यांचेसाठी स्वच्छतागृह व विश्रांतीकक्षाचे बांधकाम करणे | | 14.95 | 0.00 | **5.00** | 5.00 |
| 4 | प्रशासकीय इमारत (न्यायालय) बांधकामाच्या अंतर्गत कामे | | 33.66 | 21.65 | **7.00** | 28.65 |
| | **एकूण** | **200.00** | **150.20** | **34.27** | **31.38** | **65.65** |

**(अक्षरी रुपये एकतीस लक्ष अडतीस हजार फक्त)**

उपरोक्तप्रमाणे परिशिष्ट - अ अन्वये **रु.35.00 लक्ष (अक्षरी रुपये पस्तीस लक्ष फक्त)** व व परिशिष्ट - ब अन्वये **रु.31.38 लक्ष (अक्षरी रुपये एकतीस लक्ष अडतीस हजार फक्त)** असे एकुण **रु.66.38 लक्ष (अक्षरी रुपये सहासष्ट लक्ष अडतीस हजार फक्त)** चे निधी वितरण करण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u>**

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.
2. सदरील कामांवर प्रशासकिय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच खर्च करण्यात यावा. तसेच सदरील कामे अन्य कोणत्याही निधीमधून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.
3. या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी चालू आर्थिक वर्षाअखेरीस अखर्चित राहिल्यास वा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहिल.
4. प्रस्तूत कामांना तांत्रीक मान्यतेच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे. प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाची पुनरावृती झालेली नाही / तसेच हे काम यापुर्वी कोणत्याही योजनेत झालेले नाही याची खात्री करूनच प्रत्यक्ष कामाला सुरूवात करावी. कामाची पुनरावृती झाल्यास किंवा हे काम पुर्वी झालेले असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील त्याबाबत या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.
5. या योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे, कामाचे पुर्णत्वाचे दाखले, महालेखापाल यांचे कार्यालयातील अभिलेखाशी खर्चाचे ताळमेळ घालून ताळमेळाची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.
6. या योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचे हिशेब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.
7. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा कमिटी, विधीमंडळ, कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्याचे मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहिल.
8. प्रस्तूत कामास लागणारी जमीन आपल्या विभागाच्या ताब्यात आहे याची खातरजमा करूनच काम सुरु करावे. प्रत्याक्ष कामाला सुरुवात केल्यानंतर जागेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
9. अंदाजपत्रकातील दराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तरतूदीचे अनुपालन झाले असल्याबद्दलची खात्री करुन घेण्यात यावी.
10. सदरील बांधकामाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत विभागाची राहील. देखभाल दुरुस्तीसाठी या योजनेंतर्गत कोणतीही तरतूद उपलब्ध होणार नाही. अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे/शासनाचे कोणतेही उतरदायित्व असणार नाही.
11. या आदेशान्वये वितरित करण्यात येत असलेला निधीचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक (भांडवली) ओ-51**

4515, इतर ग्राम विकास कार्यक्रमावरिल भांडवली खर्च
(00) 800, इतर खर्च
(49) जिल्हा योजना- परभणी
(49)(01) इतर जिल्हा योजना (4515 0629)
53 - मोठी बांधकामे

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. महालेखापाल कार्यालय, नागपूर
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.08 12:47:24 IST
Reason: Approved